# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 24/01/2020 (शुक्रवार)
## (सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर मौजा खापा टाऊन येथे दिनांक 23/01/2020 चे 10:30 वा. ते 12:20 वा. दरम्यान फिर्यादी नामे– किशोर सोमेश्वर खुबाळकर, वय 43 वर्ष, रा. माताखेडी खापा हे घराला कुलूप मजुरीचे कामाने शेतात गेले होते. दरम्यान फिर्यादींच्या घराच्या दाराचा अज्ञात आरोपीने कुलूप तोडून आत प्रवेश केला. तसेच आरोपीने घरात ठेवलेले नगदी 5,000/–रू. चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार विजय बारई हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 09 कि.मी अंतरावर मौजा लॉजेस्टीक पार्क निमजी येथे दिनांक 19/06/2019 ते दिनांक 01/07/2019 चे 12:15 वा. ते 23:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शकील अहमद खान, वय 37 वर्ष, रा. रिलायबल करीर्यस एस आर जैस्वाल 14 मैल कळमेश्वर जि. नागपूर यांच्या लॉजेस्टीक पार्क निमजी कळमेश्वर येथे एमएच– 40/वाय 8416 क्रमांकाच्या ट्रक मध्ये आय टीसी लिमिटेड या कंपनीच्या सिगरेटचे 118 पेटया व इतर वस्तुच्या 2 पेटया लोड केल्या होत्या. दरम्यान अज्ञात आरोपीने त्यामधुन सिगरेटच्या 25 पेटया चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक अश्विनी बावचे 8551969100 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर